ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# रा. ना. चव्हाण यांचे साहित्य, समाज, संस्कृती व लोककले विषयीचे विचार



प्रा. परमेश्वर सिद्राम हटकर
मराठी विभाग, माऊली महाविद्यालय, वडाळा,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

## प्रस्तावना :-

रा. ना. चव्हाण हे मराठीतील एक विवेकशील, संयमी, समन्वयवादी तरीही परखडपणे आपले विचार मांडणारे एक महत्वाचे विचारवंत आहेत. परिवर्तनवादी परंपरेचा त्यांचा अतिशय सूक्ष्म अभ्यास आहे. गौतम बुध्द ते यशवंतराव चव्हाण एवढा मोठा कालखंड त्यांच्या चिंतनात सतत ध्वनीत होत राहतो. तरीही १९ वे शतक हे त्यांच्या चिंतनाचे मुख्य केंद्र आहे.

१९ व्या शतकातील असंख्य दुवे ते सहजपणे उलगडून जातात. १९ व्या शतकातील अनेक तपशील ते देतात. अनेक महापुरुषांच्या कार्याचा विविध साहित्याचा ते नेमका वेध घेतात. अभ्यासकांना सहसा उपलब्ध नसणारी असंख्य साधने ते वापरतात, म्हणून संशोधकांना एक नवी दिशा मिळते. रा. ना. चव्हाण हे महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत होत. भारतीय समाज कसा असावा आणि त्यासाठी काय केले पाहिजे ? यादृष्टीने सकारात्मक विचार करणारे एक समाजचिंतक म्हणून आपण त्यांना ओळखतो. संतत्वाचे मनोधर्म असणारे विचारवंत महाराष्ट्राच्या वैचारिक नामावलीमध्ये महत्वाचे स्थान मिळविले आहे. ते आयुष्यभर झपाटल्यासारखे लिहीत राहिले. सुमारे १५० लेख त्यांनी विविध विषयावर लिहिले. मराठीतील एक विवेकशील संयमी समन्वयवादी तरीही परखडपणे आपले विचार मांडणारे एक महत्वाचे विचारवंत आहे. परिवर्तनवादी परंपरेचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. महात्मा गौतम बुध्द ते यशवंतराव चव्हाण एवढा मोठा कालखंड त्यांच्या चिंतनात सतत ध्वनीत होत राहतो.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) रा. ना. चव्हाण यांच्या दलित ग्रामीण व संत साहित्याचा अभ्यास करणे.
२) रा. ना. चव्हाण यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक साहित्याचा अभ्यास करणे.
३) रा. ना. चव्हाण यांच्या ऐतिहासिक व परिवर्तनवादी विचारांचा अभ्यास करणे.
४) रा. ना. चव्हाण यांच्या वैचारिक लेखांचा अभ्यास करणे.
५) रा. ना. चव्हाण यांच्या लेखनशैलीचा अभ्यास करणे.

## रा. ना. चव्हाण आणि ग्रामीण साहित्यासंबंधीचे विचार :-

ग्रामीण दलित अशा स्वतंत्र संज्ञा साहित्यामध्ये मानावेत का ? हा सातत्याने उपस्थित केला जाणारा प्रश्न आहे. रा. ना. चव्हाण यांच्या मते नागरी आणि नांगरी या दोन जीवनपध्दती सर्वस्वी भिन्न असल्याने ग्रामीण दलित अशा स्वतंत्र प्रवाहाची निर्मिती होणे स्वाभाविक आहे. ग्रामीण साहित्याची पुर्वपीटीका रा. ना. चव्हाण यांनी विषद केलेली आहे. खेड्याचा निर्मितीपासून

ग्रामीण साहित्याचा प्रारंभ झाला. प्रारंभी ते मौखिक स्वरुपात अभिव्यक्त होईल. मौखिक साहित्य काव्यरुपाने अधिक व्यक्त होईल. परंतु कालांतराने मुद्रण व संकलन न झाल्याने मौखिक ग्रामीण साहित्य बुडाले.

ग्रामीण साहित्याची सामाजिक बांधिलकी आणि साहित्य उत्तरदायित्व अधोरेखित करुन ग्रामीण साहित्यिकांना साहित्य सेवक असा नवा शब्द रा. ना. चव्हाण यांनी दिला आहे. ग्रामीण साहित्याने लोकहितवादींच्या प्रमाणे बहुजन समाजाला जागृत केले पाहिजे. साहित्यिक आणि ग्रामीण जनमाणसांच्या दोषांची परखड चिकित्सा केली पाहिजे. इहवाद, बुध्दीवाद, वैज्ञानिक दृष्टीकोन लोकांमध्ये वाढविला पाहिजे, लोकमाणसांचे वैचारिक परिवर्तन व समाज जीवनाचे भौतिक विकसन हे ग्रामीण बहुजन साहित्याचे प्रयोजन असावे अशी भुमिका त्यांनी मांडली आहे.

## रा. ना. चव्हाण आणि दलित साहित्यासंबंधीचे विचार :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रवर्तक व वैचारिक प्रेरणास्त्रोत मानले जातात. डॉ. आंबेडकरांनी दलितांना अस्मिता दिली. त्यांच्या उध्दाराचे समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण केले. त्यांच्या विचारकार्यातून प्रेरणा घेऊन जे साहित्य निर्माण झाले ते दलित साहित्य. गौतम बुध्द, चोखामेळा, संत तुकाराम, महात्मा फुले, गोपाळबाबा वलणकर, किसन फागु बनसोडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी दलित साहित्याची पूर्वपरंपरा रा. ना. नी अधोरेखित केलेली आहे. दलितांनी दलितांसाठी लिहिलेले व दलितेत्तरांनी दलित प्रश्नांवर लिहिलेले जे वाङ्मय ते दलित साहित्यात गणावे लागेल अशी दलित साहित्याची व्यापक व्याख्या रा. ना. चव्हाण यांनी केलेली आहे.

रा. ना. चव्हाण यांनी दलित साहित्य व दलित समाज संदर्भात एक महत्वाचे निरीक्षक नोंदविले आहे. आपल्या देशात अनेक दलितांना शेती आहे, दलितही शेतकरी आहे. परंतु दलित साहित्यामध्ये शेती, सहकार, पंचायत राज्य व एकूण विकासाच्या साधनांचे विधायक माध्यमांचे फारसे चित्रण येत नाही. खंडण, विरोध, संघर्ष, लढा यांची भाषा जास्त ऐकू येते. दलित साहित्यामध्ये एकसुरीपणा येत आहे. दलित ग्रामीण साहित्याने ब्राह्मवादाला फक्त विरोध करणे घेऊ नये, सत्यशोधनाची भूमिका घेऊन वास्तवाची चिकित्सा करावी. फुले-शाहु-आंबेडकर यांचीही बदलत्या संदर्भाप्रमाणे चिकत्सा करावी अशी भूमिका रा. ना. चव्हाण यांनी मांडलेली आहे.

जगामध्ये ग्रामीण समाज मोठा आहे. तसेच सर्वच प्रांतात, सर्वच राष्ट्रात दलित आहेत. शुद्रातीशुद्र जगभर पसरले आहेत, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांचा प्रश्न हा जागतिक आहे असे मत व्यक्त करतात. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य हे वेगळे प्रवाह आहेत. दलित साहित्यात ग्रामीण साहित्य विलीन होऊ नये. याचा अर्थ देशामध्ये दलित राहू नये असा शाश्वत अर्थ होतो.

## रा. ना. चव्हाण यांचे लोकसाहित्य विषयक विचार :-

लोकसाहित्य ही एक परिभाषा मराठी साहित्यात आढळते. श्रीमती सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, तारा भवळाकर, प्रभाकर मांडे इत्यादी साहित्यिकांनी लोकसाहित्य संपादन करण्यामध्ये आघाडी घेतली आहे. अर्थात् लोकसाहित्य हे देखील ग्रामीण साहित्य ठरते. कोणतेही लोकसाहित्य हे जास्त असलेल्या ग्रामीण बहुसंख्य लोकांचे असू शकते व यात काव्य, नाट्य, कलापथके, तमाशा, शाहिरी, कलगीतुरा, संतांचे अभंग यांचा समावेश होईल व अद्याप होतो. लोकसंस्कृतीचे जेवढे जतन झाले तेवढे संगोपन दलित व ग्रामीण साहित्यात एका पीढीकडून दुसऱ्या पीढीकडे झिरपत आले नाही. जात्यावरच्या ओव्या, ग्रामीण म्हणी, वाक्यप्रचार, लोककथा, लोकगीते, स्त्रियाची गीते, शेतकरी गीते या पुष्कळ बुडून गेल्या, त्यांची छपाई झाली नाही. त्याचे जतन होणे काळाची गरज होती.

## रा. ना. चव्हाण यांचे शेती व शेतकरी साहित्यासंबंधीचे विचार :-

आज महाराष्ट्रात अनेक शेती विद्यापीठे आहेत. त्यांच्या मार्फत शेतीत विविध संशोधन होत आहे. शेती व शेतकरी साहित्य म्हणजेच ग्रामीण साहित्य प्रधानता म्हटले पाहिजे. शेती व शेतीविषयक नियतकालिके मराठीत फार थोडी आहेत. दैनिक वर्तमानपत्रामधून शेतीविषयक कॉलम प्रकाशित होत असतो. आकाशवाणी व दुरदर्शनवर शेतीविषयक बरीच माहिती दिली जाते. वरील सर्वांचा शेतकरी कितपत फायदा घेतात हा प्रश्नच आहे.

शेती प्रायोगिक होऊन प्रगतशील झाली नाही, म्हणजे विज्ञाननिष्ठ व हिशोबनिष्ठ झाली नाही. शेती व शेतकरी हा भारताच्या जिव्हाळ्याच्या व अतिमहत्वाच्या विषयावर फारच थोडा विचारविनिमय झाला व होत असतो. शेती व शेतीविषयक साहित्य जोपर्यंत मागास आहे, नगण्य आहे, तेथील शेती मागासच राहील असे रा. ना. चव्हाण यांचे मत आहे.

## रा. ना. चव्हाण यांचे लोककला विषयक लेखन :-

लोकसाहित्य व ग्रामीण साहित्य यांची दखल अब्राह्मण नव्या मध्यमवर्गाने घेतली पाहिजे. लोकसाहित्य जसे आहे व होते असे लोककलाही विविध होत्या व आहेत. शहरी गायनाची शास्त्रीय पध्दत व ग्रामीण गायनकला यांच्यात मुळ फरक आहे. लोककला व लोकवाद्य प्रोत्साहानाच्या अभावामुळे बडत आहेत. उदा. ढोलकीच्या चाली, लेझीम, भटक्या विमुक्तांच्या लोककला, कोकण व गोव्याकडील लोककला, नाट्ये, देशावरचा कलगीतुरा आज दिसत नाही.

साहित्याला समाजाच्या व त्यांच्या व्यवसायाच्या मर्यादा पडलेल्या आहेत. ज्यांना विवेकवंत म्हणून संबोधले जाते ते शहरी भागातच राहणारे असतात. आजकाल श्रमजीवी व बुध्दीजीवी वर्गसुध्दा ग्रामीण भागातून पुढे आलेला आहे. त्यांच्याकडून साहित्याच्या निर्मितीची गरज आहे. परंतु ती पुर्ण होताना दिसून येत नाही, हे दुर्दैव आहे.

## रा. ना. चव्हाण यांचे मार्क्सवादी साहित्या संदर्भातील विचार :-

मार्क्सची रशियन विचारसरणी पहिल्या महायुध्दानंतर येथे आल्यापासून मार्क्सवादी लेखक व लेखन मराठीत वाढत आहे. पण रशियन आर्थिक सहाय्याने शहरी पांढरपेशीच जास्त मार्क्सवादी लेखक झाले आहेत. ग्रामीण भागातील फारच थोडे झालेले आहेत. मार्क्सवादी साहित्य म्हणजे त्यांचे स्वतंत्र, तात्विक, भौतिक व शास्त्रीय स्वरुप सांगता येते. तसे तत्वभूत व असमान्य अधिष्ठान दलित साहित्याला आहे असे नव्हे. मार्क्सवादी साहित्य दलितासाठी पिळल्या गेलेल्यासाठी पुढे आले, पण भारतीय समाज जातीबध्द, पूर्वास्पृश्यबध्द होता म्हणून दलित साहित्य जे साहित्य आक्रोश, नकार ते साहित्य. दलित साहित्य सर्वच साहित्य मान्य करते असा आशावाद दलितांकडून ठेवणे संयुक्तिक वाटत नाही.

## इतर साहित्य :-

रा. ना. चव्हाण यांनी इतर साहित्यासंदर्भात आपले विचार मांडले आहेत. शेकापचे साहित्य, साहित्य व संशोधन, स्वावलंबी साहित्य, भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन तयार झालेले साहित्य, साहित्य आणि राजकारण, डावे आणि त्यांचे राजकारण, मराठी साहित्यातील पक्षपाती भुमिका, हिंदुत्ववादी साहित्य, साहित्यातील सामाजिक भेदाभेद, दलित आणि त्यांचे नियतकालिके, मराठवाड्यातील नियतकालिके, ख्रिस्ती साहित्य व संम्मेलने, मराठी साहित्यातील चमत्कार व चिकित्सा, पुरुषप्रधान साहित्य इत्यादींचा ऊहापोह केलेला आहे.

## समारोप :-

रा. ना. चव्हाण या विचारवंताने जातीयरहित जाणीवा पेरुन सत्यशोधक समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाजाची विधायक मुल्यात्मकता पचविली. संत व सुधारकांच्या सामर्थ्याचे व मर्यादांचे मुल्यमापन करन संरचनावादी मूल्यात्मकता अभिव्यक्त केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या वैचारिक वारसात रा. ना. चव्हाण यांनी सर्व साहित्याची तटस्थपणे चिकित्सा केली आहे. सर्व जातीतील संत सुधारक क्रांतीकारकांना सत्याच्या व मानवी कल्याणाच्या सुत्रात गुंफण्याचा ऐतिहासिक प्रयत्न केला.

रा. ना. चव्हाण यांची विचारधारा ही ब्राह्मणी ही नाही व अब्राह्मणीही नाही, ती दोन्ही प्रवाहातील विधायक मुल्यांना स्विकारणारी व विध्वंसक जाणीवांना धिक्कारणारी आहे. महाराष्ट्राची संस्कृती वाचवायची असेल तर चव्हाण यांची समतोल जनसंवादी भूमिका पचविण्याची गरज आहे.

## संदर्भग्रंथ :-


१) रा. ना. चव्हाण निवडक वाड्मय- संपादक मो. नि. ठोके, पारख प्रकाशन, बेळगाव.
२) सत्यशोधक ज्योतिराव फुले, वैद्य व्दा. गो. आणि चव्हण रा. ना. सह ब्राह्ममंदिर, वाई, जि. सातारा.
३) मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान.

४) रा. ना. चव्हाण भारतीय संस्कृती व तिची वाटचाल, संपादक चव्हाण रमेश- २०११
५) रा. ना. चव्हाण दलित साहित्याचा मागोवा, संपादक चव्हाण रमेश- २०१३.
६) चव्हाण रा. ना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध, संपा. रमेश चव्हाण, २००५
७) रा. ना. चव्हाण विचारदर्शन, संपा. शरदचंद्र चव्हाण.
८) रा. ना. चव्हाण भारतीय संस्कृती व तिची वाटचाल, संपा. चव्हाण, २०११